बीड (महाराष्ट्र) ■ वर्ष ४ थे ■ अंक २६७ ■ बुधवार दि. २० नोव्हेंबर २०२४ RNI MAHMAR/2021/81481 पाने-४ किंमत ३ रुपये

# परळी वगळता सर्वत्र शांततेत मतदान




सायं.दैनिक बीड प्रारंभ
संपादक - जालिंदर ज्ञानदेव धांडे

लहान मुलांसाठी निवडणूक विभागाच्या वतीने ठिकठिकाणच्या केंद्रावर पाळण्यांची व्यवस्था करण्यात्त आली होती.

# जिल्ह्यात दुपारपर्यंत ४६.१५ टक्के मतदान

## परळी व गेवराईत सर्वाधिक तर बीडमध्ये सर्वात कमी मतदान








प्रारंभ । वृत्तसेवा

बीड : बीड जिल्ह्यामध्ये सहाच्या सहा मतदारसंघातील मतदान केंद्रावर मतदारांनी उत्साहात मतदानाला पसंती दिली. परंतु परळी मतदारसंघातील काही केंद्रांवर तोडफोडीच्या, मारहाणीच्या घटना झाल्यामुळे त्या ठिकाणी मतदारांमध्ये एक दहशत निर्माण झाली होती. परळीत लोकशाही उत्सव सुरूय की शिमगा असा प्रश्न तेथील घटनांवरून उपस्थित होत आहे. परळीमध्ये दहशत माजवणाऱ्यांविरोधात संबंधित यंत्रणेने कडक कारवाई करावी व परत अशा घटना होवू नयेत अशीही मागणी मतदारांतून होत आहे. परळी मतदारसंघ सोडला तर बीड जिल्ह्यातील बीड, आष्टी, माजलगाव, केज, गेवराई मतदारसंघ याठिकाणी सर्वत्र सुरळीत व शांततते मतदान दुपारपर्यंत झाले. दुपारी १ पर्यंत जिल्ह्यामध्ये मतदारांमध्ये अल्पसा प्रतिसाद मिळाला होता. यामध्ये आष्टी मतदारसंघात फक्त २७.४३ मतांची नोंद झाली तर बीडमध्ये ३०.१ टक्के, गेवराई ३५.९५ टक्के, केज-३३.५२ टक्के, माजलगाव-३२.८३, परळी ३६.२३ अशी मतांची नोंद दुपारी एकपर्यंत होती. तर तीन पर्यंत आष्टी मतदारसंघात ४२.८२ टक्के, बीड-३८.२३ टक्के, गेवराई-५०.७६, केज-४७.१३, माजलगाव-४६.४२ टक्के, परळी-५२.८१ टक्के अशी मतांची नोंद झाली होती. जिल्ह्यातील सहाची सहा मतदारसंघातील प्रमुख मतदारांनी आपापल्या मतदान केंद्रावर सहपरिवार मतदानाचा हक्क बजावला. तोडफोड झालेल्या ठिकाणी तोडफोडीपूर्वी करण्यात आलेले मतदान सुरक्षीत असल्याची माहिती निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी दिली. यासह ज्यांनी कोणी तोडफोड केली आहे त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल, तसेच मतदारांनी निर्भीडपणे मोठ्या संख्येने मतदान करावे असेही आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले.

आष्टी-४२.८१
बीड-३८.२३
गेवराई-५०.७६
केज-४७.१३
माजलगाव-४६.४२
परळी-५२.४१























## घाटनांदूर सह चोथेवाडी, मुरंबीत तुतारीच्या उमेदवाराचा धिंगाणा- धनंजय मुंडे

परळी । प्रतिनिधी

शरद पवार गटाच्या उमेदवारांनी, त्यांचे पुत्र व त्यांच्या गुंडांनी थेट दहशत आणि गुंडशाही सुरू केली आहे. अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदूर, चोथेवाडी, मुरंबी, जवळगाव आदी गावांमध्ये लाठ्या काठ्या व दगड हातात घेऊन थेट मतदान केंद्रावरच हल्ला केला आहे. यावेळी बूथ ताब्यात घ्यायला यश न मिळाल्याने व्हीव्हीपॅट मशीन सह मतदान यंत्रांची तोडफोड करण्यात आली आहे. लाट्या काठ्या व दगड हातात घेऊन मतदान केंद्रात गुंड घुसल्याचे पाहून तेथील मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपला जीव वाचवून पळ काढला असल्याचे मत सुद्धा माध्यमांशी बोलताना धनंजय मुंडे यांनी व्यक्त केले. धनंजय मुंडे यांनी तुतारीचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्यावरही काही आरोप केले आहेत.

हा जमाव इतक्यावरच थांबला नाही तर त्यांनी धनंजय मुंडे यांचे समर्थक जेष्ठ नेते तथा जिल्हा मजूर संस्थेचे अध्यक्ष बन्सी अण्णा शिरसाट

**व्हीव्ही पॅट मशिन्स ची तोडफोड**

**ज्येष्ठ नेते बन्सी अण्णा सिरसाट यांच्या वाहनावर हल्ला, दगडफेक करत दहशत, बन्सी अण्णा बालंबाल बचावले**


**धनंजय मुंडे यांची कारवाईची निवडणूक आयोगाकडे तक्रार**

**जनतेने पहावे गुंडगिरी आणि दहशत कोण करतंय - धनंजय मुंडे**


यांच्या वाहनावर दगडफेक्क करत हल्ला केला. यावेळी दगड फेक करत शिरसाठ यांच्या गाडीची तोडफोड करण्यात आली आहे. शेकडोंच्या जमावाने केलेल्या या हल्ल्यातून बन्सी अण्णा शिरसाठ हे बालमबाल बचावले आहेत.

ज्या मतदान केंद्रांवरती आपल्याला मतदान मिळणार नाही अशा प्रकारचा अंदाज येताच त्या मतदान केंद्रांवरती जाऊन हल्ले करण्याचा कार्यक्रम महाविकास आघाडीचे उमेदवार व त्यांचे समर्थक करत आहेत. घाटनांदुर येथे घातलेल्या धुडगुसानंतर तेथील सर्व मशीन निष्क्रिय झाल्या असून सध्या मतदान प्रक्रिया बंद आहे. ही घटना लोकशाहीला काळीमा फासणारी असून या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करत धनंजय मुंडे यांनी निवडणूक आयोगाने याचे संपूर्ण फुटेज तपासत तात्काळ कारवाई करण्याची मागणी केली आहे. या हल्ल्यातील सर्व गुंडांचा शोध घेऊन त्यांच्यावर तात्काळ कारवाई करावी असे धनंजय मुंडेंनी म्हटले आहे. दहशत, दादागिरी आणि गुंडशाही असे म्हणत परळीची बदनामी करणारे व प्रत्यक्षात मात्र स्वतःच शेकडोंचा जमाव, हातात लाठ्या-काठ्या घेऊन दगडफेक करत फिरत आहेत, हल्ले करत आहेत, याची निवडणूक आयोगाने व जनतेने देखील तात्काळ दखल घ्यावी व कारवाई करावी, असे आवाहन धनंजय मुंडे यांनी केले आहे.

### तोडफोड करण्यात आलेल्या मशिनमध्ये तुमची मते सुरक्षित



परळी मतदारसंघातील काही ठिकाणी तोडफोड करण्यात आलेल्या मशिनमधील तुमची मते सुरक्षित आहेत. ज्यांनी कोणी तोडफोड केली आहे त्यांच्या विरोधात आम्ही कडक कारवाई करत आहोत. मतदारांनी निर्भिडपणे मतदान करण्यासाठी घराबाहेर पडावे असे आवाहन निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी केले आहे.







## राज्यात भाजपा महायुतीचं सरकार बहुमताने येणार आ. पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त केला विश्वास

परळी वैजनाथ। प्रतिनिधी

राज्यभरात मी अनेक ठिकाणी प्रचार सभा घेतल्या, त्याला अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला. महायुतीच्या सरकारने राबवलेल्या योजनांमुळे लोकांचा विश्वास वाढलाय, त्यामुळे राज्यात भाजपा महायुतीचे सरकार बहुमतांनी येईल असा विश्वास भाजपच्या राष्ट्रीय सचिव तथा स्टार प्रचारक आ. पंकजाताई मुंडे यांनी आज येथे माध्यमांशी बोलतांना व्यक्त केला. आमची परळीची जागा रेकॉर्डब्रेक मतांनी निवडून येईल

### परळी रेकॉर्डब्रेक मतांनी विजयी होईल

परळीच्या निवडणुकीबद्दल बोलताना त्या म्हणाल्या, ही निवडणूक सहज व सोपी झाली. महायुतीचे उमेदवार धनंजय मुंडे रेकॉर्डब्रेक मतांनी विजयी होतील असा मला विश्वास आहे.



असेही त्या म्हणाल्या. नाथरा येथे मतदानाला जाण्यापूर्वी आ. पंकजाताई मुंडे यांनी निवासस्थानी पत्रकारांशी संवाद साधला त्यावेळी त्या बोलत होत्या. गेल्या तीन तारखेपासून मी प्रचारात आहे. राज्यात वेगवेगळ्या क्षेत्रात सभा घेतल्या, सर्व ठिकाणी चांगला प्रतिसाद मिळाला. महायुती बाबत जनता सकारात्मक आहे. सरकारने जनतेच्या हितासाठी ज्या काही योजना राबवल्या आहेत, त्या यशस्वी ठरल्या आहेत, लोकांचा महायुतीबद्दल विश्वास वाढला आहेत्यामुळे आमचं सरकार बहुमतांनी पुन्हा सत्तेवर येईल. फेक नरेटिव्हचा या निवडणूकीत परिणाम होणार नाही. २०१९ मध्ये निवडणूक लढवत असताना देखील मी महाराष्ट्रात सभा घेत होते, मला ही निवडणूक फारशी वेगळी वाटली नाही असं त्या एका प्रश्नांच्या उत्तरात बोलताना म्हणाल्या.

# चला मतदान करायला जाऊया!

सध्या राज्यातील जनता वाढत्या महागाईला कंटाळली आहे. जीवनावश्यक वस्तूंचे दर गगनाला भिडले आहेत. त्यात गरिबांच्या कांद्याने सुद्धा भाव खाल्ला आहे. राज्यात सुशिक्षित बेकारांची वाढती आकडेवारी. त्यात मिळाली तर तुटपुंज्या पगाराची कंत्राटी नोकरी, म्हातारपणीचा आधार नाही. मग सांगा, अशा नोकरीचा काय उपयोग. त्यासाठी मतदार राजाने सर्वसाधारण लोकांची जाणीव असणारा उमेदवार शोधला पाहिजे. म्हणजे तो निवडून आल्यास आपल्या मतदारसंघातील मतदार राजांचे कल्याण करील. असे राज्यातील प्रत्येक मतदारसंघात झाल्यास आपल्या पुरोगामी समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्र राज्याचा विकास होण्याला वेळ लागणार नाही. त्यासाठी उमेदवार हा सुशिक्षित व अभ्यास करून विधानसभेत सर्वसाधारण जनतेचे प्रश्न मांडणारा असावा, अशा नि:पक्षपाती काम करणाऱ्या योग्य उमेदवाराला २० नोव्हेंबर, २०२४ रोजी चला तर आपण मतदान करायला जाऊया!

रवींद्र तांबे

महाराष्ट्र राज्यात २० नोव्हेंबर, २०२४ रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ या वेळात १५व्या विधानसभेच्या २८८ जागांसाठी निवडणुका होत असून त्यासाठी ४१३६ उमेदवार रिंगणात आहेत. तेव्हा निवडणुकीत भाग घेणारे राजकीय पक्ष किंवा उमेदवार कशा प्रकारे एकमेकांचे वस्त्रहरण करीत आहेत हे सुजाण मतदार राजा पाहत आहे. १८ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी प्रचाराच्या तोफा थंड होतील. नंतर २३ नोव्हेंबरला मतमोजणी होऊन त्यांच्या कार्याची पोहोचपावती मिळेल. त्यासाठी प्रत्येक उमेदवार शक्तिप्रदर्शन व आश्वासनांची खैरात करीत आहेत. तसेच गुप्त भेटी सुद्धा अधूनमधून घेतल्या जात आहेत. म्हणजे मतदार राजाने २३ नोव्हेंबरनंतर पश्चाताप करून घेण्यापेक्षा आताच मतदार राजाने जागृत राहाणे गरजेचे आहे. तरच मतदानाच्या दिवशी मतदार राजा आपल्या अमुल्य मतदानाने आपल्या हक्काचा प्रतिनिधी विधानसभेत पाठवू शकतात. आपल्या राज्यात विधानसभेचे कामकाज मुंबईतील मंत्रालयात चालते. त्यासाठी मतदार राजानी आपल्या मतदारसंघाचे वैभव करणाऱ्या उमेदवाराला मतदान केले पाहिजे.

सन २०१९च्या विधानसभा निवडणुकीत कोणत्याही राजकीय पक्षाला बहुमत मिळाले नव्हते. त्यात कोविडचा काळ, त्यानंतर राजकीय घडामोडीत विधानसभेचे कामकाज चालले. यात विकासापेक्षा अंतर्गत घडामोडीत अडीज वर्षे केव्हा गेली ही समजली सुद्धा नाही. यात सुशिक्षित बेकार वर्ग सोडा शासकीय सेवकांना सुद्धा आपल्या हक्कांसाठी लाक्षणिक संप करण्याची वेळ आली होती. मात्र निवृत्ती वेतनाचा मार्ग अजून सुटलेला नाही. आपल्या महाराष्ट्र राज्यात पहिली विधानसभेची निवडणूक १९६० साली झाली. त्यानंतर खऱ्या अर्थाने महाराष्ट्र राज्याच्या राजकीय वाटचालीला सुरुवात झाली. २०२४ सालच्या विधानसभेच्या निवडणुकीचा विचार करता, आपल्या राज्यातील प्रत्येक उमेदवारांनी ही निवडणूक प्रतिष्ठेची मानली आहे. त्यामुळे मतदार राजाने जागृत राहिले पाहिजे. ते सुद्धा राजकीय उमेदवारांच्या प्रतिष्ठेसाठी नव्हे तर देशातील लोकशाही मजबूत होण्यासाठी मतदान केले पाहिजे.

महाराष्ट्र राज्यात तृतीयपंथी मतदार ६१०१ महिला मतदार चार कोटी एकोणसत्तर २,९६,२७९ पुरुष मतदार तर पाच कोटी बावीस हजार सातशे एकोणचाळीस असे एकूण मतदार नऊ कोटी सत्तर लाख पंचवीस हजार एकशे एकोणीस आहेत. तेव्हा सुजाण राज्यातील मतदार राजाने मतदानाच्या दिवशी मतदार केंद्रावर जाऊन आपला मतदानाचा हक्क बजावला पाहिजे. कारण मतदान हे आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे. राज्याच्या विकासासाठी राज्यातील प्रत्येक मतदार राजाने मतदान करायला हवे. तेव्हा महाराष्ट्र राज्यातील तरुण असो अथवा ज्येष्ठ नागरिक प्रत्येकाचे मत सोन्याहून अधिक समृद्ध आहे हे मतदार राजाने लक्षात ठेवले पाहिजे. आज विधानसभेच्या रिंगणात असणारे भावी लोकप्रतिनिधी कशा प्रकारे विकासाचे मॉडेल प्रचार सभेत मांडत आहेत याची चांगली कल्पना मतदार राजाला आहे. तेव्हा आपल्या विभागाचा सर्वांगीण विकास करणारा व आपल्या विचारांशी प्रामाणिक असणारा नेता निवडा. असाच नेता आपल्या मतदार संघाचा विकास घडवून आणू शकतो. असे झाले तरच आपोआप राज्याचा विकास होण्याला वेळ लागणार नाही. तेव्हा अशा प्रामाणिक उमेदवाराला मतदान करा तरच खऱ्या अर्थाने आपल्या देशातील लोकशाही अधिक बळकट होईल. केवळ राजकीय पक्षाचा जाहीरनामा किंवा उमेदवारांच्या आश्वासनांना बळी पडू नका. त्यासाठी मतदार राजाने आजचा नाही तर उद्याचा विचार करावा. यातच जनतेचे हित आहे. प्रचारासाठी घरी आलेल्या प्रत्येक उमेदवाराचा सन्मान करा. मात्र स्वत:चे स्वातंत्र्य पायधुळी तुडवू नका. यातच मतदार राजांच्या मनाचा मोठेपणा आहे.निवडणुका झाल्यानंतर अमुक उमेदवारांनी पैशांचे वाटप केले अशा बातम्या वाचायला मिळतात. तेव्हा अशा व्यवहारापासून मतदाराने चार हात दूर राहावे. मी माझे अमुल्य मत का विकू? यासारखा मूर्ख दुसरा तिसरा कुणीच नसेल. जो उमेदवार मतदानासाठी पैशाचे आमिष दाखवेल त्याला मी मतदान करणार नाही अशी मतदार राजाने गोपनीय शपथ घ्यावी. म्हणजे मतदानापूर्वीच्या भ्रष्टाचाराला आळा बसेल. असे राज्यातील प्रत्येक मतदार राजाने केले पाहिजे. म्हणजे आपल्या मनातील लोकप्रतिनिधी निवडून आणू शकतो. तोच खरा मतदारसंघातील खऱ्या अर्थाने विकासक होऊ शकतो. कारण लोकांनी त्यांना निवडून दिलेल्याची जाणीव असते. असे झाल्यास महाराष्ट्र राज्याचा विकास होण्याला वेळ लागणार नाही.

# आता जबाबदारी मतदार राजाची

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी बुधवारी मतदानाचा दिवस आहे. महाराष्ट्रात कोणाची सत्ता येणार हे ठरविण्याची संधी मतदारांना मिळणार आहे. घटनेने करोडो रुपयांची संपत्ती असलेल्या व्यक्तीला जसा मतदाराचा अधिकार दिला आहे तसाच झोपडीत राहणाऱ्या व्यक्तीलाही तो मिळलेला आहे. त्या दोघांच्या मताची किंमत एकच आहे. त्यामुळे लोकशाहीच्या उत्सवात सहभागी होण्याची संधी प्रत्येक मतदार राजाला मिळणार आहे. महाराष्ट्रातील प्रचाराचा धुरळा उडाला. या निवडणुकीत सगळ्याच पक्षांनी आश्वासनांची खैरात केली. महाराष्ट्राला फुकट्यांचे राज्य बनविण्याची अहमहमिका लागली आहे का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. त्याचे कारण प्रामाणिक करदात्यांच्या तिजोरीत भर पडणाऱ्या पैशांवर राजकीय पक्षांकडून सरकारी योजनांच्या घोषणा होत आहेत, हे आता लपून राहिलेले नाही. या सर्व पक्षांकडून केलेल्या घोषणांची खरोखरच गरज आहे का, याचा विचार वेगळ्या पातळीवर जाऊन करायला हवा. दुसऱ्या बाजूला राज्य निवडणूक आयोगाने मतदानांची टक्केवारी वाढावी यासाठी जनजागृती मोहीम राबविली आहे.

मतदान प्रक्रिया मतदारांना आकर्षित करणारी असावी यासाठीही राज्यात अनेक ठिकाणी विशेष संकल्पना घेऊन मतदान केंद्रे उभारली आहेत, हे विशेष. यामध्ये वन्यजैवविविधता, सांस्कृतिक-सामाजिक वारशाचे दर्शन, स्तनदा-गर्भवतींसाठी हिरकणी मतदान केंद्र, युवा- अपंग-महिला संचालित विशेष मतदान केंद्रे उभारली गेली आहेत. अपंग मतदारांसाठी रॅम्प, व्हीलचेअर, सहकार्यासाठी स्वयंसेवकांची व्यवस्था, मतदारांसाठी शेड-पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहांची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. राज्यातील नऊ कोटी ७० लाखांपेक्षा जास्त मतदारांपर्यंत पोहोचून मतदानाची टक्केवारी वाढवण्याचा निवडणूक यंत्रणेने जो प्रयत्न केला आहे, तो स्वागतार्ह आहे. त्यात दोन कोटींपेक्षा जास्त युवा म्हणजे १८ ते २९ वयोगटातलेही मतदार आहेत, ही बाब समोर आली आहे. त्याचबरोबर 'स्वीप' कार्यक्रमांतर्गत निवडणूक आयोगाने मतदारांशी विविध माध्यमांतून संवाद साधला आहे. यावेळी मल्टिमीडियाचा प्रभावी वापर करून थेट मतदारांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न झाला आहे. त्याचप्रमाणे मतदारांना प्रोत्साहित करण्यासाठी 'अठरावं वरीस मोक्याचं', 'इथे



सगळी बोटे सारखी आहेत', 'मधाच्या बोटाला बळी पडू नका', 'निर्धार महाराष्ट्राचा विधानसभा निवडणुकीत मतदानाचा', अशा आकर्षक संदेशांचा राज्यभर वापर केल्याचे दिसून आले आहे. तसेच घरोघरी भेटी, रांगोळ्या, मानवी साखळ्या, प्रभात फेऱ्या, पथनाट्य, सायकल-बाइक रॅली, मॅरेथॉन, मतदारांना शपथ, संकल्पपत्र, विविध स्पर्धा, सण साजरे करण्याच्या निमित्ताने मतदार जागृतीपर उपक्रम राबविले आहेत. मुंबई पोलीस दलाच्या वाद्यवृंद पथकाचे सादरीकरण, निवडणूक गीताचे सादरीकरण-त्यावरचं नृत्य, टपाल विभागाकडून विशेष पाकीट-शिक्क्याचं अनावरण, मतदारांना प्रतिज्ञा, असे उपक्रमही राबवण्यात आले आहेत.

महाराष्ट्रात आरोप-प्रत्यारोपांच्या राजकारणात राजकीय परिस्थिती अस्थिर झाल्याचे राजकीय जाणकारांचे म्हणणे आहे. त्यामुळे आता मतदार म्हणून आपल्या सगळ्यांची जबाबदारी अधिक वाढलेली आहे. मुळात महाराष्ट्रात मतदानाचा टक्का कायमच कमी दिसतो. त्यातही शहरी भागांमध्ये आणखी कमी असतो, हे लोकसभा निवडणुकीच्या मतदान टक्केवारी दिसून आले आहे. निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार, ज्या दिवशी मतदान असते, त्यादिवशी सरकारी, निमसरकारी कार्यालये, शाळा कॉलेजना सुट्टी जाहीर असते; परंतु गेल्या काही वर्षांत निवडणुकीच्या दिवशी पिकनिकला जाण्याचा ट्रेंड वाढल्याचे दिसून येतो. हा ट्रेंड लोकशाहीच्या दृष्टीने दुर्दैवी आहे. मतदान करायचे की नाही याबाबत प्रत्येक नागरिकाला स्वेच्छा अधिकार असला तरी, मतदान न करता मौजमजा करणे ही लोकशाहीबाबतची उदासीनता अत्यंत वाईट गोष्ट आहे. मुंबई-पुण्यासारख्या शहरात जेमतेम पन्नास टक्के मतदार आपला हक्क बजाविताना दिसतात. त्यामुळे उद्याच्या विधानसभेच्या निवडणुकीसाठी सगळ्यांत महत्त्वाचे म्हणजे आपण सगळ्यांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावणे गरजेचे आहे.

मतदानाचा टक्का वाढला तरच अधिक चांगले राज्यकर्ते मिळू शकतात, हे सगळ्यांनीच ध्यानात ठेवले पाहिजे. प्रत्येकाने आपल्याला योग्य वाटतो त्या उमेदवाराला मत द्यावे, पण मतदान आवर्जून करावे, असे आवाहन करावेसे वाटते. तसे पाहायला गेले तर देशाला दिशा देणाऱ्या महाराष्ट्रासारख्या राज्याला मतदानाचा टक्का वाढण्यासाठी प्रशासकीय पातळीवर मोहिमा राबवाव्या लागणे कितपत योग्य आहे, याचाही विचार आपण मतदारांनी करायला पाहिजे. राज्यात यासारखी निवडणूक यापूर्वी झाली नाही, असे अनेकांचे मत आहे. यापूर्वी महाराष्ट्राने इतके राजकीय पक्ष, इतक्या वेगळ्या आघाड्या, त्यांचे जाहीरनामे अशी निवडणूक बघितली नव्हती. यावेळी मात्र किमान सहा मोठे पक्ष, त्यांच्याबरोबर राज्य पातळीवरील काही पक्ष आणि अपक्ष अशी मोठी जत्रा या निवडणुकीत दिसते आहे. त्यामुळे मतांची नक्की विभागणी कशी होणार, इथपासून ते नक्की कोण कोणाची मते कापणार, त्यामुळे कोणाचा विजय सुकर होणार, कोणाला पराभवाचा धक्का बसणार याचे अंदाज प्रत्येकजण बांधत आहे. त्यामुळे या सगळ्या प्रक्रियेत मतदार म्हणून आपल्यालाच जबाबदारीने भूमिका बजावावी लागणार आहे. आपल्याला गृहीत न धरता, एकूणच समाजाची बांधिलकी मानणारे राज्यकर्ते आपल्याला हवे आहेत. विकास सगळ्यांनाच हवा आहे, पण तो शाश्वत असला पाहिजे व आपले जगणे सुकर करणारा असला पाहिजे. आपल्या आकलनानुसार या सगळ्या गोष्टींचा सखोल विचार करून आपल्या मनातील लोकप्रतिनिधी निवडण्यासाठी अवश्य मतदान करा, असे पुन्हा एकदा सांगावेसे वाटते.

# श्री.क्षेत्र अश्वत्थलिंग देवस्थानचा आळंदी येथे पंचदिनी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

## कार्यक्रमाचा भाविकांनी लाभ घ्यावा- गुरुवर्य महादेवानंद भारती महाराज

पिंपळवंडी दि.२०(प्रतिनिधी) श्री संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली संजीवन समाधी सोहळ्या प्रित्यर्थ श्री. अश्वत्थलिंग देवालय धर्मशाळा वडगाव रोड आळंदी या ठिकाणी प्रति वर्षाप्रमाणे दि.२४ ते २८ नोव्हेंबर २०२४ दरम्यान ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण पंचदिनी अखंड हरिनाम सप्ताह आयोजित केला असून या कार्यक्रमाचा भाविकांनी मोठ्या संख्येने येऊन लाभ घ्यावा असे आवाहन महंत गुरुवर्य ह.भ.प. महादेवानंद भारती महाराज मठाधिपती श्री.क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थान पिंपळवंडी तसेच ह.भ.प. परमानंद भारती महाराज यांनी केले आहे.या सप्ताहात दररोज नियमित पहाटे ४ ते ६ काकडा आरती,६ ते ७ विष्णुसहस्रनाम,७ ते ९ ज्ञानेश्वरी पारायण,९ ते १० नाष्टा,१० ते १२ गाथा भजन,दुपारी



१२ ते १ भोजन,२ ते ४ ज्ञानेश्वरी पारायण,४ ते ५ प्रवचन, सायंकाळी ५ ते ७ हरिपाठ,७ ते ९ हरिकिर्तन,९ ते १० भोजन,१० ते ४ हरिजागर कार्यक्रमाचे आयोजन केले असून यानिमित्त दि.२४/११/२०२४ रविवार रोजी ह.भ.प.नारायण महाराज बजगुडे पिंपळवंडी यांचे प्रवचन व ह.भ.प.शिवानंद भारती महाराज जंगमबाबा संस्थान उंबरविहीरा यांचे किर्तन,दि.२५ सोमवार रोजी ह.भ.प.दत्ता महाराज बेंद्रे निरगुडी यांचे प्रवचन तर तर ह.भ.प.ज्योतीताई धनाडे महाकाळा यांचे किर्तन,दि.२६ मंगळवार रोजी ह.भ.प. सखाराम महाराज ढास मुळूक यांचे प्रवचन तर ह.भ.प.हरिश्चंद्र बर्डे महाराज नाशिक यांची किर्तन,दि.२७ बुधवार रोजी ह.भ.प.आनंद (काका) मुळे लिंबागणेश यांचे प्रवचन तर ह.भ.प.परमानंद भारती महाराज अश्वत्थलिंग संस्थान यांचे किर्तन आयोजित केले असून या सप्ताह सोहळ्याची सांगता गुरुवार दि.२८/११/२०२४ रोजी महंत गुरुवर्य महादेवानंद भारती महाराज यांचे काल्याचे किर्तन होऊन भाविकांचा सत्कार सोहळा व महाप्रसादाने होणार आहे.श्री क्षेत्र आळंदी येथे सप्ताह जाण्यासाठी प्रस्थान शुक्रवार दि.२२/११/२०२४ रोजी होणार आहे.

पान १/४ वरून

### डॉ.योगेश क्षीरसागर हे मोठ्या मताधिक्याने

माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ तब्बल ९८ हजार महिलांना मिळाला आहे, हा लाभ प्रत्येक महिलेपर्यंत पोहोचविण्यासाठी डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, भाजप, शिवसेना, रिपाइं अशा महायुतीच्या सर्व मित्र पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी प्रचंड मेहनत घेतलेली आहे. त्यामुळे लाडक्या बहिणींचा प्रचंड प्रतिसाद पाहता बीड विधानसभा मतदारसंघातून डॉ.योगेश क्षीरसागर हे मोठ्या मताधिक्याने विजय होतील. त्यांना लाडक्या बहिणीच विधानसभेत पाठवतील, असा विश्वास डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, डॉ.योगेश क्षीरसागर यांना मतदान करून बीड मतदारसंघाला विकासाच्या वाटेवर आणण्याची संधी माय-बाप जनतेने द्यावी, असे आवाहन डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी दिले आहे.

### आष्टीत कमळ

विकासकामाच्या माध्यमातून मतदारसंघात गंगा आणली आहे.तसेच कोरोना काळात स्वताचा जीव धोक्यात घालून हजारो रूग्णाचे जीव वाचवले,व अनेकांना धीर देऊन मानसिक आधार दिला.तर तालुक्यात नरभक्षक बिबट्याने मोठी दहशत निर्माण केली होती.यावेळी वनविभागाच्या दिमतीला राहून दहशत निर्माण केलेल्या

पान १/४ वरून

बिबट्याचा खत्मा करे पर्यंत त्यानी हार मानली नाही.अडीअडचणीत, सुखादुखात हाडाचे काड अन्? रक्ताच पाणी करून जनसेवेचा वसा घेतलेले आमदार सुरेश धस यांना मतदारसंघात मोठ्या प्रमाणावर वाढता पाठिंबा मिळत असून आष्टी मतदार संघात कमळ विजयाच्या वाटेवर असून माजी मंत्री सुरेश धस यांच्या कामाची पावती सर्वसामान्य जनता मतदानरुपी आशिर्वाद देणार आहे.यात कसलीच शंका नसल्याचे बोलले जात आहे. विधानसभा निवडणुकीचा प्रचार आता शेवटच्या चरणात असून या निवडणुकीत मदतीसाठी सुरेश धस आणि मतदानासाठी दुसऱ्याचं नाव , दाजीबा हे वागणं बरं नव्हं हे आमदार सुरेश धस यांचे भावनिक आवाहन करणारे वाक्य सर्वाधिक चर्चेचे वाक्य ठरले आहे . विधानसभा निवडणुकीत उमेदवार आपापले कामाची माहिती सांगून मतदानाचे आवाहन करत असतात. महायुतीचे उमेदवार सुरेश धस यांनी देखील आपला प्रचार धडाका सुरू केला. त्यात त्यांनी केलेल्या कामाचा उल्लेख करत जनतेसाठी कायमच धस कुटुंब २४ तास उपलब्ध असल्याचा दाखला देखील दिला. लोकांना कधीही मदतीसाठी धस कुटुंब उपलब्ध असते , कोणतेही काम असेल तर तिथे धस कुटुंबाचीच आठवण होते. मग निवडणुकीत मात्र दुसऱ्याला का मतदान करावं हा असा सवाल सुरेश धस

पान १/४ वरून

त्यांच्या प्रचार करत . त्यामुळे उपस्थित मतदारांनाही ही गोष्ट लक्षात येत असे. कामासाठी मदतीसाठी सुरेश धस हे नाव असेल तर मग मतदानासाठी पण त्यांच्याच नावाचा विचार केला पाहिजे असा मनोमन निर्धार मतदारांनी केलेला आहे.

### बीड मतदारसंघाच्या विकासासाठी पुन्हा

आहेत. आता तर निवडणूक आहे, मतदारांची दिशाभूल करुन ते आरोप,टिका करत होते पण मतदारसंघातील आपण सुजान मतदार बंधू तुमच्या हक्काचा लोकप्रतिनिधी म्हणून मला ओळखता.त्यामुळे पुन्हा एकदा आपल्या सर्वांची सेवा करण्याची संधी द्यावी. आपला बीड जिल्हा आणि बीड मतदारसंघ कायम आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या भूमिकेसोबत,विचारांसोबत राहिलेला आहे. संघर्षाच्या स्थितीतही आपण त्यांच्यासोबत कायम राहण्याची भूमिका घेतलेली आहे. म्हणूनच पवारसाहेबांचे हात बळकट करण्यासाठी पक्षाचा व महाविकास आघाडीचा बीडचा अधिकृत उमेदवार म्हणून माझी उमेदवारी आहे. आज २० तारखेला आपण सर्वांनी अनुक्रमांक ३, तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हासमोरील बटन दाबून मला पुन्हा प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले.

# यशवंतराव चव्हाण स्मृती समिती, अंबाजोगाई ४० वा यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

यशवंतराव चव्हाण स्मृती समितीच्या वतीने दरवर्षी आयोजित केल्या जाणार्या यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहाचे यावर्षी ४० वे वर्ष असून चार दशकपूर्ती तीन दिवसीय कार्यक्रमात उद्घाटन समारंभ, कवी संमेलन, चित्रकला स्पर्धा, बालआनंद मेळावा, कृषी परिषद, सुफी व गजल गायन शास्त्रीय संगीत सभा, यशवंतराव चव्हाण स्मृती पुरस्कार वितरण, समारोप समारंभ संपन्न होणार आहे.

अंबाजोगाईत गेल्या ३९ वर्षांपासून सातत्याने यशवंतराव चव्हाण स्मृती समितीच्या वतीने वैविध्यपुर्ण, वैचारिक, वाङ्मयीन, सांगितीक, सांस्कृतिक व विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कार, कृषिविषयक प्रदर्शन, चित्रकला स्पर्धा व प्रदर्शन तसेच ग्रंथ प्रदर्शन असे विविध कार्यकम आयोजित केले जातात. अंबाजोगाई व मराठवाड्याचा सांस्कृतिक, सामाजिक, साहित्यिक, वैचारिक वारसा जोपासण्याचा व दृढ करण्याचा प्रयत्न केला जातो. यावर्षी ४० वा यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह दि.२५, २६ व २७ नोव्हेंबर २०२४ सोमवार, मंगळवार व बुधवार रोजी संपन्न होणार आहे अशी माहिती समितीचे सचिव दगडू लोमटे यांनी दिली.

उद्घाटन व कवी संमेलन

सोमवार, दि.२५ नोव्हेंबर २०२४ रोजी सायंकाळी ५.३० वा. या समारोहाचे उद्घाटन प्रख्यात गांधीवादी विचारवंत व महात्मा गांधी यांचे पणतू तुषार अरुण गांधी यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून सुप्रसिद्ध अभिनेते व सिनेमा, मालिका निर्माते किरण माने हे अध्यक्षस्थानी असणार आहेत.

रात्रौ ८.३० वा. कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून अध्यक्षस्थानी ठाणे येथील ज्येष्ठ कवियत्री डॉ. प्रज्ञा दया पवार ह्या राहणार असून, कवी संमेलनाचे सूत्रसंचालन अकोला येथील सुप्रसिद्ध कवी गझलकार गोपाळ मापारी हे करणार आहेत. तर सुप्रसिध्द कवी डॉ. वृषाली किन्हाळकर - नांदेड, प्रा. सिसिलिया कार्व्हालो - वसई, संगिता बर्वे - पुणे, संजय चौधरी - नाशिक, बालाजी मदन इंगळे- उमरगा, रमजान मुल्ला- सांगली, जयंत चावरे - यवतमाळ, पूजा भडांगे - बेळगाव, सुनिती लिमये - पुणे, बालाजी सुतार - वर्धा (अंबाजोगाई), नारायण पुरी- छत्रपती संभाजीनगर, नितीन वरणकार - शेगांव व संजय आघाव - परळी यांचा सहभाग राहणार आहे.

४० वा यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह अंबाजोगाई - २०२४




चित्रकला स्पर्धा व बाल आनंद मेळावा

मंगळवार, दि.२६ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी शालेय चित्रकला स्पर्धा आयोजित केली आहेत. सकाळी १० वा. बालआनंद मेळावा आयोजित केला असून मुलांच्या आत्मबळ निर्माण करणारे राजेंद्र बहाळकर पुणे हे अध्यक्ष असतील तर यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबईचे मानद कार्यक्रम व्यवस्थापक दत्ता बाळ सराफ व आनंदवन वरोरा येथील धान्य रांगोळीकार चित्रकार प्रल्हाद ठक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील व शालेय चित्रकला स्पर्धेचे विजेते यांना परितोषिके प्रदान करतील. रांगभरण शालेय चित्रकला स्पर्धा त्या त्या शाळेत घेतल्या जात आहेत. तर ऐच्छिक विषय दिलेल्या ८ वी ते १० वी विद्यार्थ्यांचे स्पर्धा कार्यक्रम स्थळी होतील. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र दिले जाईल व दोन्ही गटातील प्रथम, द्वितीय, तृतीय व उतेजनार्थ विजेत्यांना रोख बक्षीस पाहुण्यांच्या हस्ते दिले जातील. . सायं. ८ वा. सुगम संगीताचे आयोजन केले आहे. मुंबई येथील सुप्रसिद्ध सुफी व गझल गायिका पूजा गायतोंडे यांचा मराठी, उर्दू, हिंदी गझल गायनाचा रंगरेझा हा संगीतबद्ध सादर करतील. साथसंगत - कीबोर्ड - मनोज राऊत, तबला - शंतनु मायी, ढोलक साथ योगेश ईंदोरिया यांचीअसेल.

शेतकरी परिषद

२७ नोव्हेबर बुधवार वार रोजी सकाळी १०.३० वा. शेतकरी परिषदेचे आयोजन केले असून प्रयोगशील शेतकरी व प्रसिद्ध कृषी कार्यकर्ते तथा मराठवाडा शेती सहाय्य मंडळ खरपुडी - जालना येथील कृषिभूषण विजय अण्णा बोराडे यांच्या अध्यक्षतेखाली शेतकरी परिषद होणार असून ते ''माझी शेती कार्य कांहीं अनुभव'' या विषयावर मार्गदर्शन करतील तर कृषी महाविद्यालय धाराशिव येथील माजी सहयोगी अधिष्ठाता तथा प्राचार्य डॉ. मोहनराव बी. पाटील - छत्रपती संभाजीनगर हे ''फळबाग पीक - लागवड पद्धती, संवर्धन व बाजारपेठ या विषयावर मार्गदर्शन करतील तर आवाड शिरपूर ता. अंबाजोगाई येथील ऊस उत्पादक व अभ्यासक पांडुरंग आवाड हे ''ऊस लागवड - स्वअनुभव व शेतकऱ्याला झालेला फायदे'' या विषयावर मार्गदर्शन करतील.

**तुषार अरुण गांधी, कुलपती डॉ. पी. डी. पाटील, अभिनेता किरण माने, कृषीभूषण विजय आण्णा बोराडे, दीप्ती नाखले, सचिन ईटकर यांची विशेष उपस्थिती व पद्मश्री पं. सतीश व्यास, पं. आदित्य कल्याणपूर, अर्शद अली खान व पूजा गायतोंडे यांच्या सांगीतिक सादरीकरणाने रंगणार यावर्षाचा ४० वा यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह**

# माजीमंत्री जयदत्त अण्णांचा आशिर्वाद; दोन तरुण आमदार विधानसभेत दिसणार

**बीड । प्रतिनिधी**

होत असलेल्या यंदाच्या निवडणुकीत ऐनवेळी चित्रच बदलले गेले,यावेळी महाविकास आघाडी आणि महायुतीचे अनेक अनुभवी उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असताना माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी आपला अर्ज मागे घेत पुतण्या डॉ योगेश क्षीरसागर यांना पाठिंबा देत सर्वाना आश्चर्यकारक धक्का दिला तर मतदानाच्या दोन दिवस अगोदर गेवराई मतदार संघातील उमेदवार विजयसिंह पंडित यांनाही पाठिंबा देत दोन तरुणांना संधी देण्याचे संकेत दिले त्यामुळे आता विधानसभेत दोन तरुण आमदार आपल्याला दिसणार आहेत.

क्षीरसागर आणि पंडित कुटुंबाचे राजकीय मतभेद सर्व जिल्ह्यांनीच पाहिले आहेत परंतु दिवसेंदिवस चित्र बदलत चालले आहे ज्येष्ठ नेते माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर हे यावेळी विधानसभेच्या रिंगणात उभे होते सहा महिन्या अगोदरपासून जयत तयारी सुरू असलेल्या या निवडणुकीत त्यांचा विजय निश्चित मानला जात होता मात्र त्यांचे पुतणे डॉक्टर योगेश क्षीरसागर हे देखील निवडणुकीच्या रिंगणात होते एकाच घरातून तीन क्षीरसागर निवडणुकीत उभे असल्यामुळे अनेक तर्क वितर्क लावले जात होते मात्र माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी अचानकपणे आपले उमेदवारी मागे घेत योगेश क्षीरसागर यांना पाठिंबा देऊन त्यांना विजयी करण्याचे आवाहन केले असे असतानाच गेवराई विधानसभेच्या निवडणुकीच्या रिंगणात उभे असलेले माजी मंत्री शिवाजीराव पंडित यांचे चिरंजीव विजयराजे पंडित यांनाही माजी मंत्री क्षीरसागर यांनी पाठिंबा देऊन दोन तरुण आमदार निवडून यावेत यासाठी प्रयत्न केले आहेत, शिरसागर आणि पंडित घराण्याचे संबंध या निमित्ताने सुधारले जाणार असून यावेळी दोन तरुण आमदार विधानसभेच्या सभागृहात दिसणार आहेत बीड जिल्ह्यात महायुतीचे चार तर महाविकास आघाडीचे दोन आमदार दिसतील असे चित्र सध्या निर्माण झाले आहे,बीड,गेवराई,आष्टी आणि परळीत महायुतीला यश मिळू शकते तर केज आणि माजलगाव मध्ये महाविकास आघाडीला यश मिळू शकते असे चित्र दिसत आहे आता उद्या दि २० रोजी होणाऱ्या मतदानानंतर दि २३ रोजी लागणाऱ्या निकालावरून सगळे चित्र स्पष्ट होणार आहे



# वाहनावर दगडफेक, अपक्ष उमेदवार गंभीर जखमी

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

गंगापूर विधानसभा मतदारसंघांचे अपक्ष उमेदवार सुरेश सोनवणे यांच्या गाडीवर वाळूजजवळील धामोरी शिवारात अज्ञाताकडून दगडफेक करण्यात आली. या घटनेत सुरेश सोनवणे यांच्यासह त्यांचे सहकारी लक्ष्मण डोळस हे देखील गंभीर जखमी झाले आहेत. ही घटना सोमवारी (१८ नोव्हेंबर) रात्री ९ वाजेच्या सुमारास घडली. दरम्यान, हल्लेखोरांचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.



सुरेश सोनवणे हे सोमवारी रात्री घरी परतत असताना तीन जणांनी त्यांच्या गाडीस हात दाखवून गाडी थांबवली. त्यांना वाटलं की, ते कार्यकर्ते असावेत. त्यामुळे ते गाडीतून खाली उतरले. तेव्हा अचानक बाजूच्या शेतातून त्यांच्या गाडीवर दगडफेक सुरू झाली. त्यात सुरेश सोनवणे यांच्यासह त्यांचे सहकारी गंभीर जखमी झाले. तर त्यांच्यासोबत असलेले इतर कार्यकर्ते किरकोळ जखमी झाले. डोक्याला दुखापत झाल्याने सुरेश सोनवणे यांना तत्काळ सीएसएमएसएस या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. सध्या त्यांची प्रकृती स्थिर आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिस उपायुक्त नितीन बगाटे यांच्यासह वाळूज पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक राजेंद्र सहाने, एमआयडीसीचे पोलिस निरीक्षक कृष्णा शिंदे यांनी रुग्णालयात धाव घेत सुरेश सोनवणे यांची विचारपूस केली. हल्ला नेमका कुणी आणि का केला याचा पोलिस शोध घेत आहेत. तर डोणगावजवळही सोनवणे यांच्या एका कार्यकर्त्याच्या गाडीवर दगडफेक करण्यात आल्याची माहिती सुरेश सोनवणे यांचे बंधू निलेश सोनवणे यांनी दिली आहे.

दगडफेक करून हल्लेखोर फरार : सोनवणे यांच्या गाडीवर दगडफेक करून हल्लेखोरांनी तिथून पळ काढला. या प्रकरणी सुरेश सोनवणे यांचे कारचालक सुरज ज्ञानेश्वर मुंडे यांच्या तक्रारीवरून पो. स्टे. वाळूज येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचा पुढील तपास वाळूज पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक संदीप वाघ करत आहेत.

# संदीप क्षीरसागर यांना प्रचंड मतांनी विजयी करा-परमेश्वर सातपुते, वरेकर

**बीड । प्रतिनिधी**

आता राज्यामध्ये होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर बीड विधानसभा मतदारसंघांमध्ये गाव भेट दौरा प्रसंगी बोलताना परमेश्वर सातपुते, गणेश वरेकर यांनी मतदारांना विनंती केली आहे, या राज्यामध्ये सत्तांतर करून महायुतीला या राज्यातील जनता पूर्णपणे वैतागलेली असून या राज्यातील शेतकरी कष्टकरी सर्वसामान्य माणूस अगदी होरपळून गेलेला आहे आणि म्हणून या सरकारने सर्व समाज घटकांवरती अन्याय करण्याचं पाप केलेले आहे या पापाची फेड करण्यासाठी या राज्यातील जनता या निवडणुकीकडे एका आशेने पाहत होती त्यामध्येच शेतकरी पूर्णपणे होरपळून गेलेला आहे आणि म्हणून या राज्यांमध्ये कधी एकदा निवडणुका लागतात आणि या निवडणुकांमध्ये या सरकारला मातीत गाडून पुन्हा एकदा नव्याने गोरगरिबांचे सर्वसामान्यांच्या हक्काचं सरकार या राज्यामध्ये आणण्यासाठी ज्या ज्या ठिकाणी महाविकास आघाडीचे उमेदवार आहेत त्यांना मोठ्या मताने निवडून देण्यासाठी जनतेनेच निवडणूक हाती घेतलेली आहे...



शिवसेनेचे पक्षप्रमुख सन्माननीय उद्धवजी ठाकरे साहेब व राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे देशाचे नेते शरदचंद्रजी पवार साहेब व कॉंग्रेसचे राहुलजी गांधी साहेब यांच्या विचारांचा एक वर्ग या राज्यामध्ये असल्याने या राज्याला आणि या देशाला पुन्हा एकदा स्थिर सरकार देण्यासाठी महाविकास आघाडी शिवाय पर्याय नाही हे सर्वसामान्य मतदारांच्या लक्षात आलेले असल्याने या निवडणुकीमध्ये सर्व गोष्टीला शह देत महाविकास आघाडीचे उमेदवार संदीप भैया क्षीरसागर यांच्या पाठीशी बीड विधानसभा मतदारसंघातील जनता विश्वास ठेवून खंबीरपनाने उभी असून येणाऱ्या २० तारखेला मतदाना मधून सर्व समाज घटकातील सर्व जाती धर्मातील लोक हे महाविकास आघाडीचे उमेदवार संदीप भैया क्षीरसागर यांना निवडून देतील हा विश्वास आहे.

बीड विधानसभा मतदारसंघांमध्ये संदीप भैया क्षीरसागर यांच्या रूपाने पुन्हा एकदा या मतदारसंघात सक्षम पर्याय असल्याने जनतेने मतदान रुपी आशीर्वाद देऊन येणाऱ्या २० तारखेला तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हा समोरील बटन दाबून संदीप भैया क्षीरसागर यांना बीड विधानसभा मतदारसंघातून प्रचंड मतांनी विजयी करावे असे आव्हान शिवसेनेचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते व जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांनी केले आहे.

# ठरलं..! आमदार पवारांच्या विकास कामांवर मतदार विजयाचा शिक्कामोर्तब करणार

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई मतदारसंघातला विकासाचा गाडा पुढे सुरू राहीला पाहिजे. त्यासाठी, ज्यांनी प्रमाणीकपणे विकासाची कामे करून, जनतेचा विश्वास संपादन केला. अशाच, विकासाभिमूख नेतृत्वाला पाठिंबा देण्याचा निर्णय गेवराई मतदारसंघातील मतदारांनी घेतला असून, आमदार लक्ष्मण पवारांच्या रिक्षाला पसंती दिल्याचे चित्र मतदारसंघात दिसून येत असून, गेवराई विधानसभेच्या निवडणुकीत आमदार पवार यांच्या कामावर, मतदार मतदानातून शिक्कामोर्तब करतील, अशी चर्चा मतदारसंघात सुरू आहे.

बुधवार ता. २० नोव्हेंबर २०२४ रोजी गेवराई विधानसभेच्या निवडणुकीसाठी मतदान होणार असून, शेवटच्या टप्प्यात आमदार पवार यांच्या रिक्षाला विधानसभेत पाठवण्याचा निर्णय मतदारांनी घेतल्याची चर्चा होऊ लागली आहे. आमदार पवार यांच्या कडे गेल्या पंधरा वर्षांपासून गेवराई नगर परिषदेची सत्ता आहे. दहा वर्षापासून ते गेवराई मतदारसंघाचे आमदार म्हणून निवडून आलेले आहेत. गेवराई नगर परिषदेच्या माध्यमातून शहरात झालेल्या कामांचा मराठवाड्यात नावलौकिक झाला असून, आमदार म्हणून त्यांनी गेवराई मतदारसंघाचा कायापालट करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. मतदार ही, त्यांच्या दहा वर्षातल्या कार्याचे जाहिर पणे कौतुक करीत असून, पून्हा आमदार पवार यांनाच आशीर्वाद मिळेल, असे एकुण चित्र, गेवराई मतदारसंघात दिसून येत आहे.



गेवराई विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीत अपक्ष उमेदवार तथा आमदार लक्ष्मण पवार यांची विकासाची कामे करण्याची पद्धती आणि स्वच्छ , पारदर्शक कारभाराने मतदारांचा विश्वास मिळवला आहे. मतदारांच्या पाठिंब्याने आमदार पवार यांचे पारडे जड झाल्याचे चित्र गेवराई मतदारसंघात दिसून येत आहे. दहा वर्षात झालेल्या विकास कामांमुळे , आमदार पवार यांच्या विषयी सहानुभूतीची लाट निर्माण झाली आहे. गेवराई शहरात आणि मतदारसंघातील विविध भागात आमदार पवार यांनी रस्ता, वीज प्रश्नावर विशेष लक्ष देऊन, मतदारसंघातील अनेक गावे थेट राष्ट्रीय महामार्गाला जोडली आहेत. ग्रामीण भागातून राज्य आणि राष्ट्रीय महामार्गाची कामे प्रगतीपथावर असल्याने, मतदारांची पसंती, आमदार लक्ष्मण पवार यांच्या रिक्षाला मिळत असून, तिरंगी लढतीत पवार यांची रिक्षा जोरात धावू लागली आहे. वीज आणि सिंचन प्रकल्पावर आणखीन काम करायची गरज असून, गेवराई मतदारसंघात या कामाच्या माध्यमातून, शेतकर्यांच्या, युवकांच्या आयुष्यात आर्थिक क्रान्ती घडवून आणायची असून, आणखी एक संधी द्या, असे आवाहन त्यांनी मतदारांना केले आहे. त्यांच्या आवाहनाला गेवराई मतदारसंघात चांगला प्रतिसाद मिळू लागल्याचे दिसून येत आहे. दरम्यान, गेवराई मतदारसंघातला विकासाचा गाडा पुढे सुरू राहीला पाहिजे. म्हणून, ज्यांनी प्रमाणीकपणे विकासाची कामे करून, जनतेचा विश्वास संपादन केला. अशाच, विकासाभिमूख नेतृत्वाला पाठिंबा देण्याचा निर्णय गेवराई मतदारसंघातील मतदारांनी घेतला असल्याने, आमदार पवार यांच्यावर गेवराई मतदारसंघातील मतदार विजयी शिक्कामोर्तब करतील, अशी चर्चा आहे.

# भाजप नेते विनोद तावडेंना घेरले

## पैसे वाटपाच्या आरोपावरून भाजप-बविआ आमनेसामने

**मुंबई । प्रतिनिधी**

**विधानसभा निवडणुकीदरम्यान पैसे वाटपाच्या आरोपावरून भाजपचे राष्ट्रीय सचिव विनोद तावडे यांना बहुजन विकास आघाडीच्या (बविआ) कार्यकर्त्यांनी तब्बल तीन तास घेरल्याची घटना घडली. त्यातून भाजप आणि बविआ कार्यकर्त्यांमध्ये संघर्ष झाला. बहुजन विकास आघाडीचे नेते हितेंद्र ठाकूर आणि आमदार क्षीतिज ठाकूर हॉटेलमध्ये पोहोचल्यानंतर पैसे वाटपाच्या आरोपावरून गोंधळ उडाला.**

विरार पूर्व भागात असलेल्या मनवेलपाडा येथील एका हॉटेलमध्ये तावडे पैसे वाटप करत असल्याचा आरोप करत बविआच्या कार्यकर्त्यांनी तावडे यांना घेरले. त्यातून बविआचे कार्यकर्ते आणि भाजप कार्यकर्ते यांच्यात चांगलीच जुंपली. काही वेळातच आमदार क्षीतिज ठाकूरही तिथे पोहोचले. या प्रकरणानंतर हॉटेलमध्ये मोठा पोलिस फाटा तैनात करावा लागला, तसेच पोलिसांनी हॉटेल सील केल्याचेही सांगितले जात आहे. दरम्यान, विनोद तावडे यांनी त्यांच्यावरील आरोप फेटाळून लावले आहेत. या घटनेवर विनोद तावडे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. पोलीस आणि निवडणूक आयोगाने चौकशी करावी, अशी मागणी विनोद तावडे यांनी केली आहे. हितेंद्र ठाकूर यांना कोणीतरी चुकीची माहिती दिली. मी इथे कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी आलो होतो, असा खुलासा तावडे यांनी केला आहे. भाजपचा खेळ खल्लास! जे काम निवडणूक आयोगानेच करायला हवे होते ते काम ठाकूर यांनी केले. निवडणूक आयोग आमच्या बॅगा तपासतो आणि इकडे शेपूट घालतो, असे ट्विट करत ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी व्हीडीओ शेअर केला आहे. विनोद तावडे यांना लाज वाटायला पाहिजे. माफ करा जाऊ द्या, असे म्हणत त्यांनी मला २५ फोन केले. जे नियमाने आहे, तशी कारवाई करावी. मला अगोदरच बातमी समजली होती, की तावडे ५ कोटी रुपये घेऊन येणार आहेत. त्यामुळे मी कार्यकर्त्यांना बोलवल्याचे हितेंद्र ठाकूर यांनी सांगितले.



# महाराष्ट्रातील 'खोकासूर' नष्ट होऊ दे !

## ठाकरेंचे तुळजाभवानीला साकडे

**तुळजापूर : प्रतिनिधी**

**महाराष्ट्रातील खोकासूर आंणि भ्रष्टासुरांची राजवट संपून महाराष्ट्राच्या संस्कृतीला साजेल अशी राजवट येऊ दे, असे साकडे मी तुळजाभवानीच्या चरणी घातले आहे, मला खात्री आहे, आई तुळजाभवानी आशीर्वाद देणारच. अशी प्रतिक्रिया शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी तुळजापूर दौऱ्यावर असताना पत्रकारांशी बोलताना दिली आहे.**

भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी पैसे वाटल्याचा आरोप बहुजन विकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी केला आहे. या प्रकरणावर बोलताना ठाकरे म्हणाले, तुळजाभवानीच्या दर्शनाला येतानाही माझी बॅग तपासली गेली. बॅगेत तर काही सापडले नाही, विनोद तावडेंच्या बॅगेत पैसे सापडल्याचे आताच तुमच्याकडून समजले. तसेच काल अनिल देशमुख यांच्यावर जो हल्ला झाला, ते दगड तपासण्याचे काम कोणी करायचे होते? म्हणूनच मी आई तुळजाभवानीला साकडे घातले आहे, भ्रष्ट राजवट एकदा या राज्यातून खतम करून टाक, असे उद्धव ठाकरे म्हणाले. हॉटेल विवांता येथे तावडे पैसे वाटत असल्याचा आरोप बविआचे नेते हितेंद्र ठाकूर आणि क्षितिज ठाकूर यांनी केला. बविआ कार्यकर्त्यांनी तावडेंचा व्हीडीओ शूट करत त्यांना रोखून धरले होते. तिथे काही डायऱ्या सापडल्या असून त्यात काही नोंदी असल्याचाही दावा केला जात आहे.

BEED PRARAMBH Newspaper Prin ed, Published and Owned by Jalinder Dnyandev Dhande and Printed at TULJABHAVANI PRINTERS, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) and published at BEED PRARAMBH OFFICE, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) Editor : Jalinder Dnyandev Dhande

बीड प्रारंभ हे पत्रक मुद्रक, प्रकाशक, मालक जालिंदर ज्ञानदेव धांडे यांनी तुळजाभवानी प्रिंटर्स, द्वारा - ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा - बीड पिन - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड प्रारंभ कार्यालय, द्वारा - ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा - बीड पिन - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.संपादक : जालिंदर ज्ञानदेव धांडे




सायं.दैनिक बीड **प्रारंभ**

बुधवार दि. २० नोव्हेंबर २०२४ (पान ४)




# बीड जिल्ह्यातील रुग्णालयांतील अग्निरोधक यंत्रणेसाठीच्या निधीचा प्रस्ताव तीन वर्षांपासून धुळखात पडुन, शासन आणखी एखाद्या जळीतकांडाची वाट पाहतेय का ?

## निधीसाठी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात यांना निवेदन -डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

३ वर्षांपूर्वी अहिल्यानगरच्या जिल्हा रुग्णालयात आग लागुन ११ जणांचा होरपळून मृत्यू झाला होता.अशा घटनांवर उपाययोजनेसाठी सरकारनेच आरोग्य विभागाकडून अग्निरोधक यंत्रणा उभारणीसाठी प्रस्ताव मागविले होते.परंतु ३ वर्षांपासून हे प्रस्ताव शासन दरबारी धुळखात पडुन असुन बीड जिल्ह्यातील १७ रूग्णालयात अग्निरोधक यंत्रणा उभारणीसाठी २८ कोटी रूपयांच्या अंदाजपत्रकासह निधी मागणीचे प्रस्ताव शासनाकडे पाठवले आहेत परंतु अद्याप निधीबाबत आरोग्य विभाग आणि शासनाने आखडलेला हात सैल केला नाही त्यामुळे सरकार आणखी एखाद्या रूग्णालयातील जळीत कांडाची वाट पहात आहे काय असा संतप्त सवाल



सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी उपस्थित केला असुन बीड जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयासह अधिनस्थ इतर १७ अशा एकुण १८ आरोग्य संस्थांच्या इमारतीमध्ये तातडीने

अग्निरोधक यंत्रणेसाठीच्या निधीची तातडीने तरतूद करण्यात यावी अशी मागणी डॉ . गणेश ढवळे, शेख युनुस,शिवशर्मा शेलार यांनी लेखी निवेदनाद्वारे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अशोक थोरात यांच्या मार्फत मुख्यमंत्री, प्रधान सचिव, आरोग्य मंत्री यांना केली असुन आंदोलनाचा ईशारा दिला आहे.

कोविड संसर्ग काळात ता.६ नोव्हेंबर २०२१ मध्ये अहमदनगरच्या जिल्हा रुग्णालयातील अतिदक्षता विभागात लागलेल्या आगीत होरपळून नवजात बालक आणि ११ रूग्णांचा मृत्यू झाल्यानंतर शासकीय रुग्णालयातील इमारतींमध्ये अग्निरोधक यंत्रणा उभारण्यात यावी हा विषय ऐरणीवर आला होता. यानंतर आरोग्य विभागाने तातडीने सर्व जिल्हा आरोग्य प्रशासनाला तातडीने अग्निरोधक यंत्रणा उभारण्यासाठीचे अंदाज पत्रक आणि निधी मागणीचे प्रस्ताव मागविले. जिल्ह्यातील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय तसेच जिल्हा रुग्णालय व अधिनस्थ आरोग्य संस्थांमध्ये ही यंत्रणा उभारणीसाठी २८ कोटी ३९ लाख रुपयांच्या निधी मागणीचे प्रस्ताव आरोग्य विभागाकडे पाठविण्यात आले. दुर्दैवी घटनेला आणि प्रस्ताव शासनाकडे पाठवुन ३ वर्षे लोटली आहेत.अशा गंभीर विषयातही सरकार निधी देण्यासाठी हात आखडता घेत असुन एकीकडे जनजागृती, जाहिराती, सरकारच्या जाहिरातींवर कोट्यवधीं रूपयांचा निधी सरकार खर्च करत असताना शासनाकडून अशा संवेदनशील विषयाकडे दुर्लक्ष होत असल्याने सामाजिक कार्यकर्त्यांनी तिव्र संताप व्यक्त केला आहे.

### अग्निरोधक यंत्रणेसाठीच्या निधीचा प्रस्ताव वरीष्ठांना पाठवला आहे :- डॉ.अशोक थोरात

बीड जिल्ह्यातील रुग्णालयांसाठी अग्निरोधक यंत्रणा शसाठीच्या निधी निधी मागणीचा प्रस्ताव शासनाला पाठविण्यात आलेला आहे. अद्ययावत आरोग्य यंत्रणा उभारणीसाठी निधी मागणीसाठी वरीष्ठांना पत्रव्यवहार करण्यात आल्याची माहिती बीड जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अशोक थोरात यांनी दिली.

### गेल्या वर्षी अग्निरोधक यंत्रणेला श्रद्धांजली लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले- डॉ.गणेश ढवळे

गेल्या वर्षी दि.४ डिसेंबर २०२३ रोजी बीड जिल्ह्यातील रुग्णालयाच्या इमारतींसाठी निधीची तरतूद करण्यात यावी यासाठी डॉ.गणेश ढवळे यांच्यासह शेख युनुस,सुदाम तांदळे,मुबीन शेख,शिवशर्मा शेलार, धनंजय सानप यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अग्नि रोधक यंत्रणेला श्रद्धांजलीअर्पण लक्ष्यवेधी आंदोलन केले होते. मात्र वर्ष उलटूनही अद्याप निधीची तरतूद करण्यात आलीच नाही.



वंचित बहुजन आघाडीचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर, अंजलीताई आंबेडकर यांनी अकोल्यातील पोद्दार इंटरनॅशनल इंग्लिश मिडीयम स्कूल, गोकुळ कॉलनी, अकोला येथे मतदानाचा अधिकार बजावला.

# परळी मतदारसंघातील माय-बाप जनतेने विकासाच्या पाठीशी मतदान रूपी आशीर्वाद उभे करावेत-धनंजय मुंडे

परळी वै. । प्रतिनिधी

विकास हा आपला पिंड असून मुंडे कुटुंबाच्या दोन पिढ्यांनी परळी मतदारसंघाची सेवा केली आहे व पुढेही शेवटच्या श्वासापर्यंत समर्पित भावनेने विकास हीच जात आणि सेवा हाच धर्म मानून काम करत राहू, परळी मतदारसंघातील तमाम जनता जनार्दनाने विकासाच्या वाटेवर चालणाऱ्या आपल्या भूमिपुत्राच्या पाठीशी मतदान रुपी आशीर्वाद उभा करावेत असे आवाहन परळी विधानसभेचे महायुतीचे अधिकृत उमेदवार धनंजय मुंडे यांनी केले आहे.

राजकारणात सक्रिय झाल्यापासून आजपर्यंत धनंजय मुंडे यांनी विविध माध्यमातून परळी मतदारसंघातील जनतेची शक्य ती सर्व सेवा केलेली आहे. मतदारसंघात मोठे व लहान अनेक विकासाचे प्रकल्प मंजूर केले असून अनेक कामे पूर्ण झाली आहेत तर अनेक कामे प्रगतीपथावर आहेत. प्रगतीपथावर व प्रस्तावित असलेली कामे पूर्ण करण्यासाठी



विकासाचा पिंड आणि तो निभावण्याची क्षमता अंगी लागते. त्यामुळे ती क्षमता अंगी असलेल्या उमेदवाराच्या पाठीशीच आपले मतदान रूपे आशीर्वाद उभे करावेत असे आवाहन धनंजय मुंडे यांनी केले आहे. परळी विधानसभा मतदारसंघातील निवडणुकी पहिल्या दिवसापासून राज्यात चर्चेची ठरली. आमदार पंकजाताई मुंडे व धनंजय मुंडे हे एकत्र असल्यामुळे सोपी आहे अशी वाटणारी लोकसभा निवडणूक वेगवेगळ्या कारणाने अंतिम टप्प्यात अत्यंत चुरशीची ठरली व पंकजाताई मुंडे यांचा अत्यंत अल्पमतांनी अनपेक्षित असा पराभव झाला. मात्र तेव्हापासून काही वरिष्ठ शक्तींनी धनंजय मुंडे यांना टार्गेट केले आहे. याचा उल्लेख धनंजय मुंडे यांनी अनेक वेळा आपल्या भाषणांमधून केला. विरोधकांकडून सातत्याने परळीच्या भूमीची, इथल्या नागरिक - मतदारांची बोगस मतदान करणारे आणि गुंडगिरी करणारे असा सातत्याने अपमान करण्यात आला. याचा रोष इथल्या जनतेच्या मनात दिसून येत आहे. हा रोष इथली जनता आपल्या मतांमधून दाखवून देईल असा विश्वास धनंजय मुंडे यांना आहे.



**बीड : शहरातील पत्रकार चंद्रकांत साळुंके यांचे काही दिवसांपूर्वी अपघात निधन झाले. पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी( नागापूर खुर्द ) येथे साळुंके कुटुंबीयांची भेट घेऊन वडील उद्धवराव व मुलगा विनय यांच्याकडे पत्रकार संघाच्या वतीने मदत देऊन सांत्वन केले. पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे यांनीही साळुंके कुटुंबीयांना वैयक्तिक पाच हजार रुपयाची मदत पाठवली. यावेळी संपादक वैभव स्वामी पत्रकार प्रशांत लहुरीकर उपस्थित होते.**

# डॉ.योगेश क्षीरसागर हे मोठ्या मताधिक्याने विजयी होतील-डॉ.सारिकाताई क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

**विधानसभा मतदारसंघात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ तब्बल ९८ हजार महिलांना मिळाला आहे. या या लाडक्या बहिणी डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या आहेत. लाडक्या बहिणींचा मिळत असलेला प्रचंड प्रतिसाद पाहता महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर हे मोठ्या मताधिक्याने विजय होतील, असा विश्वास डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी व्यक्त केला आहे.**

लोकनेत्या स्व.केशरकाकू यांच्या सामाजिक, राजकीय कार्याचा वसा आणि वारसा माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, माजी नगराध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांनी उत्तमरित्या सांभाळला आहे. हेच क्षीरसागर कुटुंबाचे कार्य पुढे नेण्याचा प्रयत्न डॉ.योगेश हे करत आहेत. ५ वर्षात विरोधकांना जे जमले नाही, ते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी कुठलेही महत्त्वाचे पद नसताना अवघ्या एकाच वर्षात साध्य करून दाखवले. आमदार फंडाइतका निधी काही महिन्यातच खेचून आणला. त्यांच्या



नेतृत्वाखाली मतदारसंघात स्वयंरोजगार, अविरत आरोग्य सेवा, क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक, सामाजिक उपक्रम, महिला, तरुण, शेतकऱ्याच्या योजना तळागाळातील व्यक्तींपर्यंत पोहचविणे, असे अनेक उपक्रम राबविले. त्यांनी कधीही जातपात, धर्म या मुद्द्याकडे लक्ष दिले नाही. २४ तास लोकांमध्ये राहून विकासाच्या मुद्द्यावर मते मागितली आहेत. बीड विधानसभा मतदारसंघात मुख्यमंत्री

# आष्टीत कमळ विजयाच्या वाटेवर

## सुरेश धस यांच्या कामाची पावती सर्वसामान्य जनता मतदानरुपी देणार

**आष्टी। प्रतिनिधी**

**मतदारसंघांमध्ये गेल्या अनेक वर्षापासून माजी मंत्री सुरेश धस जनतेच्या कामाला पडत असून सर्वसामान्य जनता आता विधानसभा निवडणुकीत त्यांच्या पाठीमागे भक्कमपणे उभी राहिली असल्याचे चित्र जाणवत आहे विरोधकांना चारी मुंड्या शेतकऱ्यात सुरेश धस यांनी प्रचारातही आघाडी घेतल्याने कमळ विजयाच्या वाटेवर असल्याचे दिसुन येत आहे.**



२३१ आष्टी,पाटोदा,शिरूर विधानसभा मतदारसंघाचे भारतीय जनता पार्टी,शिवसेना,रिपाई (आठवले गट,व मित्र पक्षाचे अधिकृत उमेदवार सुरेश रामचंद्र धस याच अनुक्रम ३ असून चिन्ह कमळ आहे.जातीपातीचं राजकारण न करता माणुसकी हीच जात आणि धर्म समजून राजकीय प्रवास करीत आहेत.आजवर मोठ्या प्रमाणावर

# बीड मतदारसंघाच्या विकासासाठी पुन्हा सेवेची संधी द्या-आ.संदीप क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

**बीड मतदार संघाला विकासाच्या उंचीवर घेऊन जाण्याची संधी आपल्या सर्वांना आता आली आहे.यापूर्वी तुम्ही दिलेल्या आशीर्वादामुळेच बीड मतदारसंघातील विकासाचे प्रलंबित अनेक प्रश्न आपल्याला मार्गी लावला आहे. विकासकामे पुर्णत्वास नेता आली. आता असाच आशिर्वाद पाठीशी ठेवून दि.२० नोव्हेंबरला मतदान यंत्रावरील अनुक्रमांक ३, तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हासमोरील बटन दाबून मला पुन्हा प्रचंड मतांनी विजयी करा. आपल्या प्रत्येक मताचा आदर करत मी बीड मतदारसंघांला विकासाच्या आणखी उंचीवर घेवून जावून सर्वांगीण विकासासाठी कटिबध्द आहे असे प्रतिपादन आ.संदीप क्षीरसागर यांनी मतदारसंघातील सर्व मतदारांना केले आहे.**



बीड मतदार संघाचे राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्ष व महाविकास आघाडी व मित्रपक्षाचे अधिकृत उमेदवार संदीप क्षीरसागर यांनी म्हटले की,आता आपण सर्वांनी आपला पक्का निर्धार करुन पुन्हा एकदा आपल्या सर्वांच्या विचारांची सत्ता आणण्यासाठी आपले मतदान वाया जाणार नाही, यासाठी तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हासमोरील बटन दाबून विजयी करण्याचे निश्चित करावे. आपले विरोधक इतके दिवस आपल्यावर अनेक आरोप करत आले

# सिताफळ संशोधन केंद्र अंबाजोगाई येथे इंदिरा गांधी यांची जयंती साजरी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

वसंतराव चव्हाण मराठवाडा कृषी विद्यापीठ अंतर्गत सिताफळ संशोधन केंद्र, अबजोगाई जिल्हा बीड येथे इंदिरा गांधी यांच्या जयंती निमित्त अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून बार्टीचे समतादूत व्यंकटेश जोशी उपस्थित होते.

कार्यक्रमात डॉ. गोविंद रावसाहेब मुंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी इंदिरा गांधी यांच्या कार्याचा गौरव करत, त्यांचे योगदान आणि नेतृत्व कौशल्य याबद्दल उपस्थितांना मार्गदर्शन केले. इंदिरा गांधी यांच्या जयंतीचे



औचित्य साधून केंद्रात विविध कार्यकम आणि विचारविनिमयाचे आयोजन करण्यात आले. उपस्थितांनी त्यांचे कार्य आणि त्यांच्या सामाजिक योगदानाची प्रशंसा केली. या कार्यक्रमासाठी प्रभारी अधिकारी डॉ. गोविंद रावसाहेब मुंडे, बार्टीचे अंबाजोगाई तालुक्याचे समतादूत व्यंकटेश जोशी, कार्यालयातील कर्मचारी अशोक चाटे, प्रवीण हुग्गे, डी. ए. वाकडे, स्वप्निल मुजमुले, पी.के मुंडे, मनोहर कांबळे, सतीश पाटोळे, उस्मान शेख, अंजली महाजन आदी कर्मचारी उपस्थित होते.

# स्व. इंदिरा गांधी यांची जयंती साजरी



**बीड । प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात स्व. इंदिरा गांधी यांची जयंती आज साजरी झाली.या प्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) महेंद्रकुमार कांबळे, जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार देशमुख आदींसह अधिकारी, कर्मचारी यांची उपस्थिती होती. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी स्व. इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच अधिकारी, कर्मचारी यांनीही पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

# मोबाईलमुळे सर्व वस्तू गायब

अंबाजोगाई । प्रतिनिधी

मोबाईल सेवेमुळे नागरिकांच्या जीवनात आधुनिकतेच्या दुनियेमुळे मोठा बदल घडलेला दिसत आहे. माणसे जवळ आली, पण मनाने दुरावल्याचा भास सध्या प्रत्येकाला जाणवत असेलच मोबाईल सेवेमुळे प्रत्येकाच्या जीवनात अमुलाग्र बदल झाला असून अनेक बाबी हद्दपार झाल्या आहेत. मोबाईल सेवा सुरू झाल्यापासून कॅमेरा, घड्याळ, टॉर्च, कॅल्क्यूलेटर, रेडीओ आदी वस्तुची क्रेझ कमी होण्याच्या मार्गावर आहे. विविध धार्मीक सोहळे तसेच छोट्या

मोठ्या समारंभाचे फोटोकाढुन जतन ठेवले जायचे, मात्र मोबाईलसेवा सुरू झाल्यापासून कॅमेरा जवळ जवळ गायब होण्याच्या मार्गावर आहे. हाताला घड्याळ असणे त्यावेळी प्रतिष्ठीतेचे लक्षण होते.



## कॅमेरा,घड्याळ,टॉर्च, कॅल्क्यूलेटर,रेडीओ आदी वस्तुची क्रेझ कमी झाली

याकरिता पूर्वी हाताला घड्याळ बांधण्याचे फॅड होते. आता मात्र मोबाईल सेवा सुरू झाल्यापासून घडयाळ जवळजवळ गायब होण्याच्या मार्गावर आहे. वेळ विचारली की,सरळ सरळ हाताकडे न बघता खिशातुन मोबाईल काढुन वेळ सांगितला जात आहे. अशा एक ना अनेक बाबीचा अधुनिकतेमुळे जीवनात बदल झालेला दिसत आहे.